आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचेकरीता नवीन वाहन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः मबाआ २०२२ /प्र.क्र.११४ /का-७ अ
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १२ ऑगस्ट, २०२६.

वाचा:-

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहन१०००/प्र.क्र.६५/२००१/विनियम, दि.१०.९.२००१,
२. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.२०१५/प्र.क्र.२९/का-७ अ, दि.१.९.२०१५,
३. महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.मबाआ-२०१५/प्र.क्र.१५१/का-७अ, दि.८.१.२०१६,
४. वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहन२०२५/प्र.क्र.१९/विनियम, दि.१७.९.२०२५.
५. समक्रमांकाचा दि.१०.१०.२०२५ रोजीचा शासन निर्णय,
६. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांचे पत्र क्र.मबाविआ/रवका/का-४/नविन वाहन/तरतुद/२०२६-२७/४३९१, दि.५.८.२०२६.

प्रस्तावना :-

आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या वापरातील एमएच-१२-एएच-७२२१ हे वाहन निर्लेखित करण्यात आले असल्याने त्याबदली उपरोक्त संदर्भ क्र.४ येथिल शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु.१७.०० लक्ष किंमतीच्या मर्यादेत (वस्तू व सेवा कर+मोटर वाहन कर+नोंदणी शुल्क वगळून) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पित तरतूदीतुन नविन वाहन खरेदी करण्यास संदर्भ क्र.५ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आली आहे. परंतु, आयुक्तालयामार्फत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सदर वाहनाची खरेदी करण्यात आली नसल्याने सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात सदर वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्याबाबत संदर्भ क्र.६ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या वापरातील एमएच-१२-एएच-७२२१ हे वाहन निर्लेखित करण्यात आले असल्याने त्याबदली उपरोक्त संदर्भ क्र.४ येथिल शासन निर्णयातील तरतूदीनुसार रु.१७.०० लक्ष किंमतीच्या मर्यादेत (वस्तू व सेवा कर+मोटर वाहन कर+नोंदणी शुल्क

वगळून) सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पित तरतूदीतून संदर्भ क्र.५ येथिल शासन निर्णयात नमूद अटींच्या अधिन राहून नविन वाहन खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. सदर वाहन खरेदीस लागणारा खर्च “मागणी क्र.X-१, मुख्य लेखाशिर्ष २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण , ०२-समाज कल्याण ००१,संचालन व प्रशासन (०१)(०१) महिला व बाल कल्याण संचालनालय (अनिवार्य) (२२३५-२०७२), १३- कार्यालयीन खर्च” या उद्दिष्टाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी मंजूर अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा साकेतांक २०२६०८१२११४६५५१६३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

VILAS RAMDAS THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2026.08.12 12:08:26 +05'30'

(वि.रा.ठाकूर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे
२. महालेखापाल, लेखा परिक्षा, महाराष्ट्र-१/२ मुंबई/नागपूर,
३. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२,नागपूर,
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
६. कार्यासन अधिकारी व्यय-६ व विनियम कक्ष, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
७. निवडनस्ती का-७ अ.